SAMPLE CONTENT

# मराठी कुमारभारती

# IQB Important Question Bank

नवीन कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित



प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

प्रिया जोईल
M.A.

इयत्ता दहावी
(मराठी माध्यम)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४ यांच्या
**नवीन कृतिपत्रिका आराखड्यावर (२०१९-२०)** आधारित

# मराठी कुमारभारती

# IQB Important Question Bank

## इयत्ता दहावी

**ठळक वैशिष्ट्ये**

- कमीत कमी वेळेत परीक्षेचा अधिकाधिक सराव.
- प्रश्नोत्तरांची गुणनिहाय मांडणी.
- कृतिपत्रिकेच्या अद्ययावत प्रारूपानुसार प्रश्नांची रचना.
- भाषाभ्यासातील व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित मुबलक कृती.
- उपयोजित लेखनाच्या उत्तम सरावासाठी कृतींचा समावेश.
- स्वयंमूल्यमापनासाठी कृतिपत्रिका समाविष्ट.

या पुस्तकात समाविष्ट Q. R. Codes स्मार्टफोनद्वारे स्कॅन करून कवितांचे भावार्थ कथन करणारे व्हिडिओज् पाहता येतील. तसेच नमुना कृतिपत्रिकेच्या खाली दिलेला Q. R. Code स्कॅन करून कृतिपत्रिकेची उत्तरसूचीही पाहता येईल.

Sample Content

Printed at: **Quarterfold Printabilities,** Navi Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 **TEID: 1297** P.O. No. 00084

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

दहावीचं वर्ष म्हणजे आपल्या शैक्षणिक जीवनातला महत्त्वाचा टप्पा! शासनाने निर्धारित केलेला ज्ञानरचनावादावर आधारित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये विकसित करणारा आहे. या अभ्यासक्रमाचा तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्याद्वारे प्रकाशित सुधारित मूल्यमापन आराखड्याचा सखोल अभ्यास करून **टार्गेट प्रकाशनाचे मराठी कुमारभारती IQB – Important Question Bank इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

कमीतकमी वेळेत परीक्षेचा अधिकाधिक अभ्यास हा उद्देश ध्यानात ठेवून IQB या पुस्तकाची रचना केली आहे. विद्यार्थ्यांना कृतिपत्रिका प्रारूपाचा अधिकाधिक सराव व्हावा यासाठी संपूर्ण अभ्यासक्रमाची गद्य, पद्य, स्थूलवाचन, भाषाभ्यास व उपयोजित लेखन अशी विभागवार मांडणी केली आहे. प्रत्येक पाठातील निवडक परिच्छेद घेऊन त्यावर गुणांनुसार कृतींचा उत्तरांसहित समावेश केला गेला आहे. पद्य विभागात कवितेच्या अधिक आकलनासाठी प्रत्येकी दोन कृतिसंच देण्यात आले आहेत. ‘मुद्द्यांच्या आधारे कवितेसंबंधी कृती’ या शीर्षकाखाली प्रत्येक पद्यावर आधारित विश्लेषणात्मक कृतींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये काव्यपंक्तींचा सरळ अर्थ लिहिण्याचा भरपूर सराव व्हावा याकरता स्वतंत्रपणे अधिकाधिक काव्यपंक्तींचा समावेश केलेला आहे. तसेच ‘काव्यपंक्तींचे रसग्रहण’ या शीर्षकाखाली प्रत्येक पद्याच्या रसग्रहणावर आधारित कृतींचा समावेश केला गेला आहे. ‘स्थूलवाचन’ विभागात गुणांनुसार सर्व प्रश्न सोडवून दिले आहेत.

व्याकरण हा भाषेचा पाया समजला जातो, हे लक्षात ठेवून ‘भाषाभ्यास’ विभागात व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित विविध कृतींचा मुबलक प्रमाणात समावेश केलेला आहे. कृतिपत्रिकेच्या या प्रारूपामध्ये ‘उपयोजित लेखन’ हा सर्वाधिक गुणांसाठी विचारला जाणारा विभाग आहे. त्यामुळे, या विभागात विविध लेखनप्रकारांचा आदर्श उत्तरांसहित अंतर्भाव करण्यात आला आहे; जेणेकरून विद्यार्थ्यांची लेखनशैली विकसित होईल. ‘कृतिपत्रिकेचे प्रारूप अधिक सुस्पष्ट व्हावे व स्वयंमूल्यमापन करता यावे याकरता नमुना कृतिपत्रिकेचा समावेशही यात करण्यात आला आहे. सर्व कवितांचे विश्लेषण करणारे व्हिडिओज् तसेच नमुना कृतिपत्रिकेची उत्तरसूची Q. R. Code मार्फत देण्यात आली आहे.

Sample content

प्रयत्नांती परमेश्वर! चला... नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, नवीन अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया, तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबतच आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती**: द्‌वितीय

Sample Content

## Disclaimer

This reference book is transformative work based on 'Marathi Kumarbharati; First Reprint: 2019' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# मराठी कुमारभारती
# कृतिपत्रिका आराखडा

**वेळ : ३ तास** **एकूण गुण: ८०**

### घटकनिहाय गुणविभागणी

| अनु. क्र | घटक | एकूण गुण | विकल्प गुण |
|---|---|---|---|
| १ | गद्य | १८ गुण | |
| २ | पद्य | १६ गुण | ४ गुण |
| ३ | स्थूलवाचन | ०६ गुण | ३ गुण |
| ४ | भाषाभ्यास | १६ गुण | ४ गुण |
| ५ | उपयोजित लेखन | २४ गुण | ३३ गुण |
| | एकूण गुण | ८० गुण | |

*याशिवाय भाषिक घटकांवर आधारित कृतींमध्ये विचारण्यात येणाऱ्या कृतींनुसार काही विकल्प गुण आहेत.

**विभाग १ : गद्य** **एकूण गुण १८**

**(अ) १ पठित उतारा – ७ गुण**
**(आ) १ पठित उतारा – ७ गुण** } १३० ते १५० शब्द
**(इ) १ अपठित उतारा – ४ गुण** – ८० ते १०० शब्द

**(अ) आणि (आ) – ०७ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी –**

(१) आकलन कृती – २ गुण
(२) आकलन कृती – २ गुण
(३) स्वमत – ३ गुण

**(इ) ४ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी –**

(अ) आकलन कृती – २ गुण
(आ) आकलन कृती – २ गुण

Sample Content

## विभाग २: पद्य एकूण गुण १६

**(अ) पठित पद्य** **८ गुण**

पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या पद्यांपैकी कोणतीही एक कविता कृतिपत्रिकेत देणे.

**८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी** –

| | | |
|---|---|---|
| (१) | आकलन कृती | २ गुण |
| (२) | आकलन कृती | २ गुण |
| (३) | कवितेतील दिलेल्या कोणत्याही दोन ओळींचा सरळ अर्थ | २ गुण |
| (४) | काव्यसौंदर्य | २ गुण |

(दिलेल्या पद्यातील कोणत्याही २ ओळी देऊन त्यावर काव्यसौंदर्यासाठी योग्य कृती विचारणे)

**(आ) कवितेवरील आधारित कृती विचारणे-** **८ गुण**

'अ' साठी दिलेली कविता सोडून पाठ्यपुस्तकातील कोणत्याही दोन कवितांची फक्त नावे कृतिपत्रिकेत देणे व त्यावर आधारित कृती विचारणे.

**८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी** –

**१. खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा. ४ गुण**

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री. | १ गुण |
| (२) | प्रस्तुत कवितेचा विषय. | १ गुण |
| (३) | प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा.<br>(कवितेतील कोणतेही २ शब्द देणे व दोन्ही सोडवणे) प्रत्येकी १ गुण | २ गुण |
| (४) | प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश लिहा. | २ गुण |
| (५) | प्रस्तुत कवितेची भाषिक वैशिष्ट्ये लिहा. | २ गुण |
| (६) | कवितेतून व्यक्त होणारा विचार लिहा. | २ गुण |
| (७) | कवितेतील दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा. | २ गुण |
| (८) | प्रस्तुत कविता तुम्हांला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण लिहा. | २ गुण |

**४ गुणांसाठी वरीलपैकी कोणत्याही कृती विचारणे.**

प्रत्येक कृती १ किंवा २ गुणांचीच असावी. १/२ गुणांसाठी कृती विचारली जाऊ नये.

**२. काव्यपंक्तींचे रसग्रहण** **४ गुण**

'अ' व 'आ'साठी दिलेल्या कविता सोडून पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या पद्यांपैकी कोणत्याही एका कवितेतील रसग्रहणास अनुकूल अशा २ किंवा ४ ओळी कृतिपत्रिकेत देणे. दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

Sample Content

## विभाग ३ : स्थूलवाचन — एकूण गुण ६

प्रत्येकी ३ गुणांच्या २ कृती

(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित ३ कृती देणे व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित)

## विभाग ४ : भाषाभ्यास — एकूण गुण १६

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती** — ८ गुण

१) समास – द्विगू , कर्मधारय, द्वंद्व (वैकल्पिक द्वंद्व, समाहार द्वंद्व, इतरेतर द्वंद्व) — २ गुण

२) शब्दसिद्धी – शब्द – प्रत्ययघटित, उपसर्गघटित, अभ्यस्त — २ गुण

३) वाक्प्रचार – (४ वाक्प्रचार कृती देणे व त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित) ४ गुण

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.

कृतिपत्रिकेत ४ वाक्प्रचार देणे व त्यांपैकी २ सोडविणे अपेक्षित

प्रत्येक वाक्प्रचाराचा अर्थ – १ गुण

प्रत्येक वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग – १ गुण

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती** — एकूण ८ गुण

**(१) शब्दसंपत्ती** – ४ गुण

अ) समानार्थी शब्द

ब) विरुद्धार्थी शब्द

क) एकवचन / अनेकवचन
वचन बदला / वचन ओळखा

ड) शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहिणे –
तीन शब्दसमूह देणे त्यांपैकी दोन सोडवणे अपेक्षित

ई) शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे

} यांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १ गुणांच्या ४ कृती विचारणे अपेक्षित

**(२) लेखननियमांनुसार लेखन** – २ गुण

१) अचूक शब्द ओळखा – (कोणतेही ६ शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे, पर्यायातील ४ पैकी एकच शब्द (लेखननियामांनुसार) अचूक असावा. वरील ६ शब्दांपैकी ४ शब्द सोडवणे अपेक्षित

किंवा

वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीचे शब्द ओळखून दुरुस्त करा. प्रत्येक वाक्यात २ शब्द लेखननियमांनुसार चुकीचे असतील अशी ४ वाक्ये देणे. त्यांपैकी २ वाक्ये सोडवणे अपेक्षित.

Sample Content

**(३) विरामचिन्हे** १ गुण

१) योग्य विरामचिन्हे वापरा.
२) विरामचिन्हे ओळखा.
३) चुकीची विरामचिन्हे बदला.

} यांपैकी ०१ गुणासाठी कोणतीही एक कृती विचारणे

**(४) पारिभाषिक शब्द** १ गुण

गद्य, पद्य या दोन्ही विभागांतील घटकांवर आधारित कोणतेही २ पारिभाषिक शब्द देणे व दोन्ही सोडवणे अपेक्षित

(प्रत्येक शब्दासाठी १/२ गुण)

**विभाग ५ : उपयोजित लेखन** **एकूण गुण २४**

**(अ)** **६ गुण**

१. **पत्रलेखन**

| | | |
|---|---|---|
| औपचारिक | किंवा | अनौपचारिक |
| मागणी/ विनंती | | कौटुंबिक |

किंवा

२. सारांशलेखन – ५ गुण (विभाग १ गद्य – इ (प्र.१ इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा सारांश लिहिणे)

विभाग १ गद्य – इ (प्र.१ इ) मधील अपठित गद्य उतारा वाचा व त्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ)** **१० गुण**

(१) जाहिरात लेखन
(२) बातमी लेखन
(३) कथालेखन

} प्रकारानुसार (६० ते ९० शब्द) } कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर आधारित कृती देणे. त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित (प्रत्येकी ५ गुण)

**(ई) लेखनकौशल्य** (१०० ते १२० शब्द) **८ गुण**

(१) आत्मकथन
(२) वैचारिक
(३) प्रसंगलेखन

} कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर आधारित कृती देणे त्यांपैकी १ सोडवणे अपेक्षित



Sample Content

# अनुक्रमणिका


| | विभाग १ – गद्य (एकूण १८ गुण) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| प्र.१. (अ)/(आ) | पठित गद्य उतारे (१४ गुण) | १ |
| प्र.१. (इ) | अपठित गद्य उतारे (४ गुण) | ४४ |
| **विभाग २ – पद्य (एकूण १६ गुण)** | | |
| प्र.२. (अ) | आकलन व काव्यसौंदर्यावर आधारित कृती (८ गुण) | ५० |
| प्र.२. (आ) – १ | मुद्द्यांच्या आधारे कवितेसंबंधी कृती (४ गुण) | ७२ |
| प्र.२. (आ) – २ | काव्यपंक्तींचे रसग्रहण (४ गुण) | ८७ |
| **विभाग ३ – स्थूलवाचन (एकूण ६ गुण)** | | |
| प्र.३. | स्थूलवाचन (६ गुण) | १०३ |
| **विभाग ४ – भाषाभ्यास (एकूण १६ गुण)** | | |
| प्र.४. (अ) | व्याकरण घटकांवर आधारित कृती (८ गुण) | ११७ |
| प्र.४. (आ) | भाषिक घटकांवर आधारित कृती (८ गुण) | १३७ |
| **विभाग ५ – उपयोजित लेखन (एकूण २४ गुण)** | | |
| प्र.५. (अ) | पत्रलेखन व सारांशलेखन (६ गुण) | १६९ |
| प्र.५. (आ) | जाहिरातलेखन, बातमीलेखन, कथालेखन (१० गुण) | १८९ |
| प्र.५. (इ) | लेखनकौशल्य (८ गुण) | २०९ |
| **नमुना कृतिपत्रिका** | | २२३ |


**सूचना:** १. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पाठांचे व पद्यांचे क्रमांक पाठ्यपुस्तकानुसार ठेवण्यात आले आहेत.

२. पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

३. सुलभतेच्या दृष्टीने येथे आकृतिबंधावर आधारित कृतींमध्ये (१/२/३/४) असे अनुक्रमांक देऊन उत्तरे देण्यात आली आहेत. परीक्षेत असे क्रमांक देण्यात येणार नाहीत. परीक्षेत सूचनेनुसार आकृती काढणे अपेक्षित आहे.

Sample Content

विभाग १

# गद्य

## पठित गद्य उतारे - प्र. १. (अ)/(आ)

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत गद्य विभागात **प्र.१.(अ) आणि (आ)** मध्ये प्रत्येकी साधारणत: १३० ते १५० शब्दांचे दोन पठित उतारे देण्यात येतील. प्रत्येक उताऱ्यावर ७ गुणांच्या कृती विचारण्यात येतील. यामध्ये विकल्प (Option) देण्यात येणार नाही. या ७ गुणांची कृतिनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे:

**१. आकलन कृती** **२ गुण**

**२. आकलन कृती** **२ गुण**

वरील दोन्ही कृतींमध्ये 'आकृती पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'एका शब्दात उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा', 'योग्य जोड्या जुळवा', 'कारणे लिहा', 'घटनेचा / कृतीचा परिणाम लिहा', 'एका वाक्यात उत्तर लिहा', '_ असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा', 'तुलना करा', 'फरक लिहा' यांसारख्या वैविध्यपूर्ण कृतींपैकी कोणत्याही कृती विचारल्या जाऊ शकतील.

**३. स्वमत** **३ गुण**

विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारे, अभिव्यक्ती क्षमता व विचारांची मांडणी जोखणारे प्रश्न येथे विचारण्यात येतील.

**लक्षात ठेवा:**

१. दिलेला उतारा दोन वेळा वाचा.

२. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.

३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.

४. परीक्षेत आकलनावर आधारित प्रश्नातील आकृती पेनने काढणे अपेक्षित आहे.

५. 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा / योग्य पर्याय निवडा' ह्या कृतीच्या उत्तरात विद्यार्थ्यांनी पूर्ण विधान लिहिणे अपेक्षित आहे.

६. 'योग्य जोड्या जुळवा' या कृतीच्या उत्तरात प्रत्यक्ष जोडी लिहिणे अपेक्षित आहे.

Sample Content

## पाठ २: बोलतो मराठी

**उतारा १**

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

*i. [ १ ] ← **भाषा वापरताना अर्थाचा अनर्थ टाळण्यासाठी आवश्यक उपाय** → [ २ ]

ii. [ १ ] ← **प्रत्ययांची जागा अनेकवेळा चुकते अशी ठिकाणे** → [ २ ]

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.२ वरील ओळ क्र. १३ ते २४ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा. [शब्दप्रयोगाप्रमाणे वाक्प्रचार............................... असे म्हणायला हवे.]**

**२. i. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

*अ. शब्दांचा अर्थ जाणून घेण्याचे साधन [ ]

ब. अकलेचा कांदा म्हणजे [ ]

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

परिच्छेदात वर्णन केलेली भाषेची खास शैली कोणती?

**३. स्वमत** **(३)**

*‘तुम्ही शहाणे आहात’ या वाक्यातील शहाणे या शब्दाच्या अर्थछटा लिहा.

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. शब्दकोशाचा वापर करण्याची सवय लावणे
२. क्रियापद वापरताना नामाला योग्य प्रत्यय लावणे

ii. १. सार्वजनिक समारंभ २. वाहिन्या

**२.** i. अ. शब्दकोश ब. अतिशहाणा

ii. शब्दप्रयोग व वाक्प्रचार ही भाषेची खास शैली होय.

**३.** ‘शहाणे’ या शब्दातून दोन अर्थछटा निर्माण होतात. त्यातून सुज्ञ, समजूतदार असा एक अर्थ, तर ‘अतिशहाणा’ हा दुसरा अर्थ निघतो. आपल्या बुद्धीचा योग्य वापर करत विचारपूर्वक वागणाऱ्या व्यक्तीकरता ‘शहाणे’ असा शब्दप्रयोग केला जातो, तर स्वत:ला हुशार समजून बढाई मारणाऱ्या किंवा स्वभावाने आगाऊ असलेल्या व्यक्तीला ‘अतिशहाणा’ असे म्हटले जाते.

Sample Content

म्हणजेच, पहिल्या अर्थछटेत गुण, तर दुसऱ्या अर्थछटेत दुर्गुण अशा परस्पर विरुद्ध अर्थाने हा शब्द वापरला जातो.

उदा. चांगले वागणाऱ्या, चांगले काम करणाऱ्या मुलाबद्दल बोलताना आई 'माझा मुलगा शहाणा आहे' असं म्हणते, तर आगाऊपणे वागणाऱ्या मनुष्यास 'शहाणा झालास का रे?' किंवा 'तो जरा अतिशहाणाच आहे' असे म्हटले जाते. अशाप्रकारे, 'शहाणे' या एकाच शब्दातून वेगवेगळ्या अर्थछटा निर्माण होतात.

## उतारा २

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे खालील कृती सोडवा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**शब्दांची व्युत्पत्ती शोधण्याचे फायदे लिहा.**

१ | २ | ३ | ४

शब्दांची पाळेमुळे किती दूरवर पसरलेली आहेत ते कळते.

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.३ वरील ओळ क्र.३० ते ३९ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[भाषेतली गंमत जाणून ........................................अर्थ अवलंबून असतो.]**

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i. मोरांबा या शब्दाची व्युत्पत्ती कशी झाली?

ii. दन्तमूलीय म्हणजे काय?

**३. स्वमत** **(३)**

'भाषेतली गंमत जाणून घेण्याचा एक मार्ग म्हणजे शब्दांची व्युत्पत्ती शोधणे' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

Sample Content

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. भाषेची गंमत जाणता येते
२. नवी माहिती मिळते
३. शब्दांच्या मुळांशी गेल्याने चुका टळतात
४. शब्द मनात पक्का रुजतो

**२.** i. जुन्या काळी साखर मॉरिशसवरून येत असल्याने तिला मोरस असे म्हटले जाई, त्यामुळे या मोरस शब्दावरून मोरांबा या शब्दाची व्युत्पत्ती झाली.

ii. जे ध्वनी उच्चारताना जिभेच्या टोकाचा वरच्या दातांच्या मुळांना स्पर्श होतो त्या ध्वनींना दन्तमूलीय असे म्हणतात.

३. शब्दामागील खरा अर्थ शोधण्याकरता त्याच्या मुळाशी जाणे म्हणजेच त्याच्या व्युत्पत्तीचा शोध घेणे होय. एखादया शब्दाची निर्मिती कशी झाली, तो इतर एखादया भाषेतून स्वीकारण्यात आला आहे का हे सर्व व्युत्पत्ती शोधल्यावर समजते. शब्दांच्या निर्मितीमागची ही सगळी पार्श्वभूमी समजून घेणे रंजक ठरतेच. त्याचबरोबर शब्दांचे मूळ, त्याचा उच्चार, रचना इत्यादी गोष्टी समजल्यामुळे तो शब्द वापरताना चूकही होत नाही. शब्दांविषयीचे असे ज्ञान वाढल्यामुळे आपली भाषा समृद्ध होते, तो शब्द योग्य प्रकारे वापरून त्यातील आनंदही मिळतो, म्हणूनच भाषेचा आनंद खऱ्या अर्थाने लुटायचा असेल, तर शब्दांची व्युत्पत्ती शोधणे महत्त्वाचे ठरते.

## उतारा ३

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे खालील कृती पूर्ण करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

i. [ १ ] ← **भाषेवर प्रेम करण्यासाठी करायला हव्या अशा गोष्टी** → [ २ ]

ii. [ १ ] ← **मराठी भाषेने आपल्यासाठी केलेल्या गोष्टी** → [ २ ]

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३ वरील ओळ क्र. ५२ ते ६२ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[आपण आपल्या भाषेवर .................................... विसरून चालणार नाही.]**

**२. i. खालील चौकटी पूर्ण करा.** **(१)**

*अ. मराठी भाषेला लेखिकेने दिलेली उपमा [ ]

ब. 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी...' या काव्याचे कवी [ ]

**ii. खालील घटनेचे/ कृतीचे परिणाम लिहा.** **(१)**

आपणास भाषेचे अर्थसौंदर्य कळले.

**३. स्वमत** **(३)**

* लेखिकेने मराठी भाषेचा केलेला सन्मान तुमच्या शब्दांत लिहा.

**उत्तर:**

**प्र.१. (अ)/(आ).**

१. i. १. भाषेतील शक्तिस्थळे जाणून घेणे  २. भाषेचा योग्य सन्मान राखणे

ii. १. आपल्या भावजीवनाला आकार दिला

२. आपल्या भावना व्यक्त करायला आधार दिला



Sample Content

२. i. अ. आईची ब. कविवर्य सुरेश भट
ii. तर आपण 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी... ' हे कविवर्य सुरेश भटांचे शब्द उच्चारायला खऱ्या अर्थाने पात्र ठरू.

३. लेखिकेच्या मते मराठी भाषा ही आपल्या मातेसमान आहे. या मातृभाषेने आपले भावजीवन घडवले आहे. आपल्याला आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी आधार दिला आहे. तेव्हा तिची ही थोरवी समजून घेऊन तिला सन्मान देणे हे आपले कर्तव्य आहे. आपण आपल्या या भाषेवर प्रेम केले पाहिजे. आपल्या या भाषेची शक्तिस्थळे समजून भाषेमध्ये पारंगत झाले पाहिजे. जर आपण आपल्या भाषेचा सखोल अभ्यास केला, त्यात प्राविण्य मिळवले, तर त्यातले अर्थसौंदर्य आपल्याला उमगेल आणि तेव्हाच आपण 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी...' हे कविवर्य सुरेश भटांचे शब्द उच्चारायला पात्र होऊ, अशा शब्दांत लेखिकेने मराठी भाषेचा सन्मान केला आहे.

## पाठ ३: आजी: कुटुंबाचं आगळ

**उतारा ४**

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**आजीने या कामांच्या वाटण्या केलेल्या होत्या**
↓ १ ↓ २ ↓ ३ ↓ ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.५,६ वरील ओळ क्र. १८ ते ३२ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[खरं तर आजीनं ........................................... पुन्हा डोळं झाकणार.]**

**२. ओघतक्ता पूर्ण करा.** **(२)**

**स्वयंपाक झाला की आधी बाळगोपाळांची पंगत बसायची**
↓
१
↓
**आजी धपाटे घालून खाऊ घालायची**
↓
२
↓
**शेवटी सगळ्या बायका मिळून जेवत**

Sample Content

**३. स्वमत** **(३)**

आजच्या काळात एकत्र कुटुंब पद्धतीची आवश्यकता वाटते का? तुमचे मत सोदाहरण लिहा.

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. भाकऱ्या करणे  २. धुणं धुणे  ३. कालवण करणे  ४. भांडी घासणे

**२.** १. आजी पुढे सरकायची आणि आई किंवा काकी जेवण वाढायची
२. बाळगोपाळांच्या जेवणानंतर रानातल्या भाकऱ्या बांधल्या जात

**३.** सध्या एकत्र कुटुंब पद्धती दुर्मीळ होऊन विभक्त कुटुंबांचे प्रमाण वाढत आहे; मात्र यामुळे माणूस अधिकाधिक एकलकोंडा बनत चालला आहे. लहान मुले किंवा वृद्ध घरात एकटे राहिल्याने अनेक मानसिक, भावनिक समस्या उद्‌भवत आहेत. नात्यांमधील ओलावा नाहीसा होत आहे. आताच्या काळात घरातील स्त्री-पुरुष दोघेही काम करत असल्याने लहान मुलांना सांभाळण्यासाठी पाळणाघराचे पर्याय शोधतात; मात्र या ठिकाणी मुलांना गरजेचे असलेले प्रेम, माया, ममता मिळेलच असे होत नाही. एकत्र कुटुंबात अशी कोणतीही अडचण निर्माण होत नाही. सर्वजण एकमेकांच्या मदतीकरता सदैव तयार असतात. एकत्र कुटुंबात माणूस समजूतदारपणाने, जबाबदारीच्या जाणिवेने मिळूनमिसळून वागायला शिकतो. इतरांची मने जपायला शिकतो. माणसांना आपल्या माणसांचा खंबीर आधार असतो. मानवाला त्याच्या एकाकीपणातून बाहेर काढण्याकरता एकत्र कुटुंबाची गरज भासते.

## उतारा ५

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील आकृती पूर्ण करा.** **[मार्च २०१९](२)**

**आगळची वैशिष्ट्ये**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.६ वरील ओळ क्र. ३२ ते ४३ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[झोप होता होता ............................................ संरक्षक कवच होतं.]**

**२. i. एका शब्दात उत्तरे लिहा.** **[मार्च २०१९](१)**

अ. लेखकाच्या गावचे वर्तमानपत्र

ब. त्या वर्तमानपत्राची संपादक

Sample content

**ii. पुढील घटना उताऱ्याच्या आधारे क्रमाने लिहा.** **[मार्च २०१९] (१)**

अ. म्हातारीची ढाळज सुटायची

ब. वाडा शांत व्हायचा

क. कडुसं पडायच्या आधी मैफिल मोडायची

ड. माणसं ढाळजंत बसायची

**३. स्वमत** **(३)**

*'आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं ' या वाक्याचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. सहा फूट लांब आणि पाऊण फूट रुंद

२. सागवानी लाकडापासून बनलेली

३. पितळी वाघाच्या जबड्यात कडी असलेले तोंड

४. भिंतीतल्या देवळीत आरपार जाणारी

**२.** i. अ. ढाळज ब. आजी

ii. अ. कडुसं पडायच्या आधी मैफिल मोडायची

ब. म्हातारीची ढाळज सुटायची

क. माणसं ढाळजंत बसायची

ड. वाडा शांत व्हायचा

**३.** वर्तमानपत्राच्या माध्यमातून आपल्या आजूबाजूला, जगभरात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे, बदलाचे ज्ञान बातमीरूपाने आपल्यापर्यंत पोहोचते. लेखकाच्या वाड्याच्या ढाळजेमध्ये दुपारच्या वेळात बायका आपली कामे घेऊन येत. ती पूर्ण करता करता त्यांच्या गप्पा, चर्चा होत असत. त्यातून त्यांचा मनोरंजनाचा हेतू तर साध्य होईच; पण सोबतच आजूबाजूला काय चालले आहे, याबाबत त्यांना माहिती मिळे. वर्तमानपत्रात जशी बातम्यांची चर्चा केली जाते त्याचप्रमाणे ढाळजेतही विविध ठिकाणी घडलेल्या घटनांवर प्रत्यक्ष चर्चा होत असे. जसे वर्तमानपत्रात बातम्या छापण्यापूर्वी त्यांची खात्री करून घेतली जाते त्याचप्रमाणे लेखकाच्या ढाळजेत आलेल्या बातम्या गावभर जाण्यापूर्वी त्यांची शहानिशा होत असे. आजी याची संपादक असे. त्यामुळेच, 'आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं' असे लेखकाने म्हटले आहे.

Sample Content

## पाठ ५: वसंतहृदय चैत्र

**उतारा ६**

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** (२)

i. **वसंताच्या पुष्पमुद्रेचे चिन्ह ल्यालेले महिने**
- १
- चैत्र
- २

ii. **चैत्राला दिलेल्या उपमा**
- १
- २
- ऋतुराज

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.११ वरील ओळ क्र. १ ते १६ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[फाल्गुन, चैत्र आणि......................................पानांची सारखी सळसळ.]**

**२. i. एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

नवपल्लवांनी आणि फुलांनी डवरलेल्या वृक्षलतांव्यतिरिक्त मधुमासाचे वैशिष्ट्य कशात आहे?

**ii. खालील घटनेचे/कृतीचे परिणाम लिहा.** (१)

पिंपळाला नवी पाने आल्यावर उन्हात ती भडक गुलाबी पाने चमकतात.

**३. स्वमत** (३)

*'चैत्र हा खरा वसंतात्मा, मधुमास आहे' या संकल्पनेचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

Sample Content

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. फाल्गुन २. वैशाख

ii. १. वसंतात्मा २. मधुमास

**२.** i. नवपल्लवांनी आणि फुलांनी डवरलेल्या वृक्षलतांबरोबरच फुलांतून, फळांतून वाहणारा मधुरस हे मधुमासाचे वैशिष्ट्य आहे.

ii. परिणामी, त्या झाडावर सुंदर पुष्पांचे गेंद फुलल्याचा भास होतो.

**३.** फाल्गुन, चैत्र आणि वैशाख या तीन महिन्यांमध्ये वसंतऋतू निसर्गावर राज्य करत असतो. हा ऋतू निसर्गामध्ये सौंदर्याची लाट घेऊन येतो. त्यात अनेक बदल घडवून आणतो; मात्र चैत्र

महिन्यात वसंताचे सौंदर्य परिसीमा गाठते. हिरवी पालवी, रंगीबेरंगी फुले यांचबरोबर फळांचे सौंदर्यही विलक्षण असते. याच काळात फळे, फुले मधुरसाने ओसंडून वाहत असतात. एकेक काडी जोडत पक्षी आपापली घरटी विणत, त्यात स्वप्न सजवत असतात. निसर्गाच्या मनमोहक रूपाचे दर्शन या चैत्रातच होत असते आणि ते दृष्ट लागावी इतके रम्य असते. असा हा सृष्टीला नवचैतन्याने भरणारा, वसंतऋतूत प्राण फुंकणारा हा महिना जणू त्या ऋतूचा आत्माच असतो. त्यामुळे, या चैत्राला वसंतात्मा व मधुमास म्हटले आहे.

## उतारा ७

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. ***i. उताऱ्याच्या आधारे दिलेल्या वैशिष्ट्यावरून झाडाचे नाव लिहा.** **(१)**

| वैशिष्ट्ये | झाडाचे /वेलीचे नाव |
|---|---|
| अ. निळसर फुलांचे तुरे | ________ |
| ब. कडवट उग्र वास | ________ |

**ii. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

चैत्रातील पर्णशोभेचे आणि फळशोभेचे वर्णन या झाडांशिवाय अपुरे आहे.

[ ] व [ ]

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.१२ वरील ओळ क्र. ४८ ते ६० वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[शेजारचे कडुनिंबाचे ............................................ तेही झोके घेतात.]**

२. **i. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

लेखिकेने करंजाच्या फुलाला कशाची उपमा दिली आहे?

**ii. कारण शोधा व लिहा.** **(१)**

पोपट किंवा कावळे कैऱ्यांवर चोचींनी प्रहार करतात कारण......

३. **स्वमत** **(३)**

* वसंतऋतूशी निगडित तुमची एखादी आठवण समर्पक शब्दांत लिहा.

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. अ. कडुनिंब ब. करंज

ii. आंबा, फणस

२. i. लेखिकेने करंजाच्या फुलाला टोपडे घातलेल्या बाल घनश्यामाची उपमा दिली आहे.

ii. त्यांना त्या कैऱ्या पाडाला लागल्या आहेत, की नाहीत ते पाहायचे असते.

Sample Content

३. दोन वर्षांपूर्वी वसंतऋतूच्या आगमनाच्या काळात मी आई-बाबांसोबत आजोळी गेलो होतो. अंगणात जाताच नेहमी मन आकर्षून घेणारे सोनचाफ्याचे झाड पूर्णपणे छाटलेले दिसले. माझ्या आवडीचे असलेले; मात्र आता एकही पान नसलेले ते झाड पाहून माझ्या डोळ्यांत पाणी दाटले. आजोबांनी मला जवळ घेत ते झाड छाटणे त्याच्या वाढीकरता आवश्यक असल्याचे समजावले आणि लवकरच वसंत आपला महिमा दाखवेल असेही सांगितले. दोन-तीन दिवसांतच त्या झाडामधून हिरवी पालवी डोकावू लागली आणि माझी उत्सुकता ताणली. ती कोवळी – लुसलुशीत पोपटी रंगाची पाने आता वेगाने वाढू लागली. बघता बघता आठवडाभरातच त्या सोनचाफ्याचे हिरवाईने नटलेले रूप पुन्हा एकदा मन आकर्षून घेऊ लागले. वसंताचा हा महिमा प्रत्यक्ष पाहताना एक वेगळेच समाधान लाभले.

## उतारा ८

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

**लेखिकेला दिसणाऱ्या पक्ष्यांच्या घरट्यांचे विशेष**

→ १ → २ → ३ → ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.१३ वरील ओळ क्र. ६३ ते ७७ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[आणि फणस? त्याला ........................................ पाहायला जास्त आवडते.]**

**२. ओघतक्ता पूर्ण करा.** (२)

**पौष-माघात फणसाला फुगीर मिरचीसारखे हिरवे कोके येतात**
↓
१
↓
२
↓
**आतल्या हिरव्या फणसावर खसखशीसारखे बारके दाणे दिसू लागतात**

**३. स्वमत** (३)

*'चैत्र महिन्यातील पक्ष्यांच्या घरट्यांना लेखिका वसंताच्या चित्रलिपीतली विरामचिन्हे म्हणतात', या विधानाची सत्यता पटवून द्या.

Sample Content

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. लोंबत्या आकाराची २. वाटोळी चेंडूसारखी ३. पसरट गोल ४. काळीकबरी

**२.** १ एकेक कोका दुभंगतो २. वरचे टरफल तपकिरी होऊन गळते

**३.** चैत्र महिन्यात वसंताच्या आगमनामुळे निसर्गात सुंदर बदल होऊ लागतात. जणू निसर्गाचे हे नवेपण तो चित्ररूपानेच आपल्यासमोर मांडत असतो. त्याची ही लिपी जितकी समजून घेता येते, जितकी अधिक वाचता येते, तितका आनंद त्यातून गवसत जातो. या चित्रलिपीत पक्षी आणि त्यांची घरटी यांना विशेष स्थान आहे. चैत्रात पक्ष्यांना नवनिर्मितीचे वेध लागतात. त्यासाठी घरटी बांधणे, ती सजवणे अशी कामे सुरू असतात. विविध आकारांची, विविध प्रकारची घरटी पाहताना आपली नजर त्यातील सौंदर्यावर खिळली जाते. त्यांचे सौंदर्य पाहताना मन तेथे क्षणभर घुटमळते, स्थिरावते आणि त्या सुखद, मनोरम दृश्याचा काही काळ थांबून आस्वाद घेते. त्यातून मनाला विश्राम मिळतो. त्यामुळे, अखंड चालणाऱ्या या चित्रलिपीतील हा विराम भाषेतील विरामचिन्हांप्रमाणे भासतो, जो निसर्गाचे अप्रतिम सौंदर्य थबकून पाहायला भाग पाडतो.

## पाठ ७ : गवताचे पाते

### उतारा ९

**प्र.१.(अ)/(आ).उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

***१. आकृती पूर्ण करा.** **(२)**

**गवताच्या पात्याची स्वभाववैशिष्ट्ये**

→ १ → २ → ३ → ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.२४ वरील ओळ क्र. ४ ते १८ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[तो आवाज ऐकून ........................................... पृथ्वीवर पडत होती.]**

**२. i. वैशिष्ट्ये लिहा.** **(१)**

१ ← **वसंतऋतूचा स्पर्श** → २

***ii. कारण लिहा.** **(१)**

झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्यानं गळून पडणाऱ्या पानाकडे तक्रार केली, कारण .........

**३. स्वमत** **(३)**

* गवताच्या पात्याच्या ठिकाणी तुम्ही असता, तर तुम्ही पानाला काय उत्तर दिले असते?

Sample Content

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. चिडखोर २. अरसिक ३. तक्रारखोर ४. स्वप्नाळू

**२.** i. १. संजीवक

२. विलक्षण जादू असणारा

ii. गवताचे चिमणे पाते धरणीमातेच्या कुशीत झोपत सुंदर स्वप्न पाहत असताना, झाडावरून गळून पडणाऱ्या पानाच्या आवाजाने त्याची झोपमोड होऊन त्याचे स्वप्न भंग पावले.

**३.** गवताच्या पात्याच्या जागी मी असते, तर मी पानाला समजावले असते, की तू तुझ्या या अस्तित्वाचा उगीचच गर्व करू नकोस. आज उच्च स्थानी असणारा कधीच जमिनीवर येणार नाही असे होत नाही. आज ना उद्या तुलाही जमिनीतच मिसळावे लागेल. ज्या मातीमध्ये तू विलीन होणार आहेस त्याच मातीतून माझा जन्म पुन्हा एकदा होणार आहे. तीच माती माझ्या जन्माचे कारण बनणार आहे. त्यामुळे, आपले दोघांचेही जीवन या मातीशी संबंधित आहे. आपण परस्परांशी वाद घालण्यात काहीच अर्थ नाही. त्यामुळे, आपण न भांडता, सामंजस्याने वागून आपापली भूमिका बजावली पाहिजे.

## उतारा १०

**प्र.१.(अ)/(आ). उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

*i.

१ ← **पानाची स्वभाववैशिष्ट्ये** → २

ii.

१ ← **गवताच्या पात्याकरता परिच्छेदात आलेले शब्द व शब्दसमूह** → २

↓

अरसिक

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.२४ वरील ओळ क्र. ९ ते २१ वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[पानाला राग आला .................................... चेंदामेंदा केला यांनी !]**

**२. *i. कारण लिहा.** **(१)**

'अरसिक गवताच्या पात्याला गाणं समजणार नाही' असे गळून पडणारे पान म्हणाले कारण ....

Sample Content

**ii. खालील वाक्यांच्या साहाय्याने गवताचे पाते आणि पिकलेले पान यांच्या वृत्तीतील फरक स्पष्ट करा व तक्ता पूर्ण करा.** **(१)**

अ. गोड स्वप्न बघणारे
ब. स्वत:ला रसिक समजणारे
क. कर्णकटू आवाज सहन न होणारे
ड. स्वत:ला उच्चपदस्थ समजणारे

| गवताचे पाते | पिकलेले पान |
|---|---|
| १. | १. |
| २. | २. |

**३. स्वमत** **(३)**

*'माणसातील ठरावीक मनोवृत्तीची पुनरावृत्ती वारंवार होत असते' हे परिच्छेदाच्या आधारे स्पष्ट करा.

**उत्तर:**

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. स्वत:च्या उच्चपदाचा खोटा अभिमान २. दुसऱ्याला क्षुद्र लेखण्याची वृत्ती

ii. १. चिडखोर बिब्बा २. क्षुद्र

**२.** i. गवताचे पाते जमिनीवरील मातीत असल्याने त्याला पानाप्रमाणे उच्च वातावरणाची कल्पना नाही, त्याने कधीही जीवनगाणे गायलेले नाही, असे पानाचे मत आहे.

ii.

| गवताचे पाते | पिकलेले पान |
|---|---|
| **गोड स्वप्न बघणारे** | **स्वत:ला रसिक समजणारे** |
| **कर्णकटू आवाज सहन न होणारे** | **स्वत:ला उच्चपदस्थ समजणारे** |

**३.** 'गवताचे पाते' या रूपक कथेतील प्रस्तुत परिच्छेदाच्या आधारे लेखकाने गवताचे पाते व पिकलेले पान यांच्या संवादातून पिढ्या-पिढ्यांमधील असलेल्या विचारांतील अंतरावर, मानवी जीवनातील विसंवादांवर प्रकाश टाकला आहे. मानवाच्या जन्मापासून त्याच्या वाढीबरोबर त्याच्या विचारांचीही जडणघडण होत असते. बदलत्या भूमिकेनुसार त्याच्या विचारांमध्ये बदल होत जातात. प्रत्येकजण त्या वेळच्या स्वत:च्या विचारांवर ठाम राहतो. त्यामुळे, दोन पिढ्यांमधील विचारांची दरी वाढून त्यांच्यात कलह सुरू होतात. तरुण पिढीला आपल्या वडील पिढीचा उपदेश आवडत नसतो; परंतु आजची तरुण पिढी जेव्हा प्रौढ बनते तेव्हा तीही जुनाच कित्ता गिरवते आणि पुढच्या तरुण पिढीला उपदेशही करते. अशाप्रकारे, मानवी मनोवृत्तींची पुनरावृत्ती होत राहते. दुसऱ्याची स्थिती लक्षात न घेता माणूस नेहमी स्वत:च्याच भूमिकेतून विचार करत राहतो.



Sample Content

## AVAILABLE BOOKS:

- Pre-Primary
- MH State Board
  - Std. I - X ▸ Eng. & Mar. Med.
  - Std. XI - XII ▸ Sci. & Com. (Eng. Med.)
- CBSE
  - Class X ▸ Eng. Med.
- Entrance Exams
  - Medical ▸ NEET, Online & Offline Test Series
  - Engineering ▸ MHT - CET, JEE (Main), Online & Offline Test Series
- General
  - Basics of Calculus Simplified
  - Career Margdarshak




A collection of Model Question Papers & Solutions of Std. X (Eng., Mar. & Semi Eng. Med.) based on NEW PAPER PATTERN




A collection of Model Question Papers & Solutions of Std. X (Mar. Med.) based on NEW PAPER PATTERN

**Visit Our Website**

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.


**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org


Subscribe to our channel

Like our page